**"वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य-रत्न पुरस्कार" योजना सुरु करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.१४७/आरोग्य ३**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९.

**वाचा :**

**१) आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.राआअ/ एसटीडीसी/ बाठापुयोप्र/ ११४१४४/१९, दि. ०८.०३.२०१७.**

**प्रस्तावना :-**

राज्यात आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देणे, आरोग्यविषयक उपक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे आणि लोक सहभागातून विविध आरोग्य कार्यक्रम यशस्वी करणे या उद्देशाने आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या विविध घटकांना महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडून पुरस्कार प्रदान करुन गौरविण्याकरीता आरोग्य - रत्न पुरस्कार सुरु करण्याबाबत व त्यासाठी योजनेचे स्वरुप, रोख रक्कम पुरस्कार, सन्मान चिन्ह, कार्यक्रमाचे आयोजन करणे याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा यांचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता. त्याअनुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देणे, आरोग्य विषयक उपक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे आणि लोक सहभागातून विविध आरोग्य कार्यक्रम यशस्वी करणे या उद्देशाने आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, डॉक्टर, पत्रकार व क्षेत्रीय कर्मचारी

यांच्यासाठी “वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य - रत्न पुरस्कार” सन २०१९-२० पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरस्कार देण्यात येणारी संस्था किंवा व्यक्ती | एकूण पुरस्कार | पुरस्काराची रक्कम (रुपये) | पुरस्काराची एकूण रक्कम रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारी स्वयंसेवी संस्था (NGO) | १ | १,००,०००/- | १,००,०००/- |
| २ | आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे डॉक्टर | ३ | १,००,०००/- | ३,००,०००/- |
| ३ | आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट वार्तांकन करणारे पत्रकार | १ | १,००,०००/- | १,००,०००/- |
| ४ | आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे कर्मचारी | ५ | १,००,०००/- | ५,००,०००/- |

२. राज्यस्तरीय समिती:- सदर पुरस्कार बाबत शासनास शिफारस करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **अधिकारी** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | आयुक्त,आरोग्य सेवा,मुंबई. | अध्यक्ष |
| २ | संचालक, आरोग्य सेवा १ - मुंबई. | सदस्य |
| ३ | संचालक, आरोग्य सेवा २- पुणे. | सदस्य |
| ४ | अतिरिक्त अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई | सदस्य |
| ५ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), पुणे. | सदस्य |
| ६ | सहसंचालक, आरोग्य सेवा (तांत्रिक), मुंबई. | सदस्य |
| ७ | सहसंचालक, आरोग्य सेवा ( रुग्णालये), मुंबई. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८ | संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ९ | उपसंचालक, आरोग्य सेवा (आयईसी), पुणे. | सदस्य सचिव |
| १० | वैद्यकिय क्षेत्रातील वरिष्ठ पदावरुन सेवानिवृत्त अधिकारी (शासन नियुक्त) | सदस्य |

३. पुरस्कार निवडीचे निकष - प्रत्येक पुरस्काराच्या वर्गासाठी वेगळे निकष असतील. या पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समिती या योजनेंतर्गत पुरस्कारासाठी गुणांकन व शिफारसीकरीता पात्रता याबाबत खालील निकष विचारात घेईल.

**अ)- स्वयंसेवी संस्था**

१. संस्था महाराष्ट्र राज्यात कार्यरत असणारी असावी.

२. धर्मादाय आयुक्ताकडे किमान ५ वर्षापूर्वी नोंदणी झालेली संस्था असावी.

३. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमामध्ये लगतचे किमान ३ वर्ष भरीव सहभाग असावा.

४. सनदी लेखापालामार्फत लगतच्या किमान ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असावे.

५. आरोग्य विषयक जनजागृतीचे विशेष कार्यक्रम, मेळावे, शिबिरे, आयोजनामध्ये व आरोग्य सेवा यामध्ये जास्तीत जास्त सहभाग असावा.

६. आरोग्य सेवेत/महिला व बाल आरोग्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात आलेले असावेत.

७. दुर्बल घटकांसाठी/दुर्गम भागात आरोग्य विषयक उपक्रम राबविलेले असावेत.

८. समाजामध्ये आरोग्य सेवेच्या माध्यमातून नाविण्यपूर्ण कार्यक्रम राबवून दुर्बल घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणलेले असावेत.

९. आरोग्य शिक्षण विषयक उपक्रम राबविले असावेत.

**ब)- वैयक्तिक पुरस्कार**

१. किमान १० वर्ष अखंड सेवा असावी.

२. संस्था / रुग्णालय यांच्या कामामध्ये उल्लेखनीय सहभाग असावा.

३. कामाची गुणवत्ता चांगल्या पध्दतीची असावी.

४. सहकारी व सामान्य जनतेशी सौजन्यपुर्ण संबंध असावेत.

५. समाजामध्ये आरोग्य सेवेच्या माध्यमातून नाविण्यपूर्ण कार्यक्रम राबवून दुर्बल घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणलेले असावेत.

६. आरोग्य शिक्षण विषयक उपक्रमामध्ये हिरीरीने सहभाग घेतला असावा.

वरील प्रत्येक दर्शकासाठी केलेल्या कामगिरीनुसार गुण देण्यात येतील. या गुणांकानुसार सर्वोत्कृष्ट पुरस्कार्थ्याची निवड करण्यात येईल.

४. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या शिफारशीसहित नामांकने राज्य समिती स्तरावर सादर करण्यात येतील. दर्शकामधील गुणांकनानुसार राज्यस्तरावर छाननी करुन व आवश्यकता असल्यास कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष भेटी देऊन समिती पडताळणी करेल व याबाबत शासनास शिफारस करेल.

५. वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्काराचे नियोजन व वेळापत्रक उप संचालक, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क, पुणे यांनी संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे यांच्या मान्यतेने करावे. पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम शक्यतो वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या दिनांक २३ जानेवारी या जन्मदिनी आयोजित करण्यात यावा. याप्रमाणे नियोजन करुन नियोजित वेळापत्रकानुसर कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा -२ पुणे यांनी करावी.

६. डॉ.आनंदीबाई जोशी पुरस्कार प्राप्त व्यक्तीचा सदर पुरस्कारासाठी विचार करण्यात येणार नाही.

७. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०३- महिला कल्याण, (०१) महिला कल्याण योजना (राज्य योजनांतर्गत योजना), (०१)(०१)

डॉ.आनंदीबाई जोशी गौरव पुरस्कार (२२३५ ३१८६), ५०- इतर खर्च" यालेखाशिर्षाखालील तरतुदीतून भागविण्यात यावा

८. सदर शासन निर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला, उपविभाग-तीन मधील अ.क्र.४,नियम क्र.२७(२) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१५४६२२६४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.09.17 17:04:59 +05'30'

**( रो.दि.कदम पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव.
२. मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण, यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण, यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
५. आयुक्त, कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,मुंबई
६. संचालक, आरोग्य सेवा-१, मुंबई.
७. संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे
८. उप संचालक, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
९. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

११.वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.

१२.सार्वजनिक आरोग्य विभाग (सर्व कार्यासने) मंत्रालय, मुंबई.

१३.निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).